**<u>ठळक बातम्या</u>**

- आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धांमध्ये भारताला ३० सुवर्णसह एकूण ११४ पदकं, स्पर्धेच्या इतिहासातली सर्वोत्तम कामगिरी

- शिकाऊ वाहन परवाना मिळवण्यासाठीची किमान गुणपातळी ६० टक्क्यांवरुन ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव

- कोलकात्यामध्ये २ नक्षलवादी शरण, झारखंडमध्ये तिघांना अटक

आणि

- भारत-चीन सीमेवरची परिस्थिती बिघडायला गस्तीचा ठरवलेला मार्ग चीननं बदलणं कारणीभूत असल्याचं भारताचं मत

**<><><><><>**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई पॅरा क्रीडास्पर्धांमध्ये आज भारतानं ९ सुवर्ण, ८ रौप्य आणि ८ कांस्यपदकं अशी तब्बल २५ पदकांची कमाई केली. सध्या ३० सुवर्ण, ३५ रौप्य आणि ४९ कांस्य अशा ११४ पदकांसह भारत चौथ्यास्थानी आहे. या स्पर्धांच्या इतिहासातली भारताची ही सर्वोत्तम कामगिरी आहे. पदक तालिकेत चीन पहिल्या, जपान दुसऱ्या, उजबेकिस्तान तिसऱ्या तर कोरिया पाचव्यास्थानी आहे. या स्पर्धेच्या उद्या होणाऱ्या समारोप समारंभात नेमबाज मोना अग्रवाल आणि ॲथलीट निशाद कुमार भारताचे ध्वजवाहक असतील. भारतीय खेळाडूंच्या आजच्या कामगिरी विषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**- - - होल्ड - व्हाइस कास्ट - - -**

*(पॅरा नेमबाज मोना अग्रवालने महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोजिशन्स SH1 प्रकारात जागतिक विक्रम मोडून सुवर्ण पदकावर नाव कोरलं.*
*हरविंदर सिंह आणि विजय सुंडी या जोडीनं पुरुष रिकर्व्ह डबल्स तिरंदाजीत सुवर्ण पदक पटकावलं. तर महिलांच्या रिकर्व्ह डबल्समध्ये भावना आणि पूजा जतियां यांनी रौप्य पदक मिळवलं.*

*बॅडमिंटनमध्ये थुलासिमति मुरुगेसनने महिला सिंगल SU5 गटात रौप्य पदक मिळवलं. पुरुषांच्या एकेरी SL 3 गटात नितेश कुमारने सुवर्ण*
*पदक जिंकलं. तर प्रमोद भगत याला रौप्य पदक मिळालं. दुसरीकडे पुरुषांच्या एकेरी SL 4 गटात नवीन शिवकुमारने सुवर्ण पदक जिंकलं. तर महिला एकेरीत सुमति सिवन नित्या श्री हिने रौप्य पदक मिळवलं. महिला दुहेरीच्या SU5 प्रकारात थुलासिमति मुरुगेसन आणि मानसी जोशी यांनी सुवर्ण पदक पटकावलं.*
*ॲथलेटिक्समध्ये प्रमोदने पुरुषांच्या पंधराशे मीटर शर्यतीच्या T 46 प्रकारात रौप्य पदक मिळवलं. पुरुषांच्या ४०० मीटर शर्यतीत T 44 प्रकारात जागतिक विक्रम नोंदवत संदीप कुमारने सुवर्ण पदकावर नाव कोरलं, तर अजय कुमारने कांस्य पदक मिळवलं. लांब उडी प्रकारात निमिषा चक्कुंगरपरम्बिल हिने रौप्य पदक मिळवलं. पुरुषांच्या भाला फेक स्पर्धेत F 37 प्रकारात हेनी ने सुवर्ण पदकावर शिक्कामोर्तब केलं आणि जागतिक विक्रम नोंदवला.*
*टेबल टेनिसमध्ये पुरुष दुहेरीच्या MD4 प्रकारात जेहान दोराब मदान आणि शुभम वाधवा यांनी कांस्य पदक मिळवलं.*
*जलतरणपटू हिमांशु नंदलने पुरुषांच्या १०० मीटर फ्री स्टाइल S11 प्रकारात कांस्य पदक मिळवलं. ५० मीटर फ्री स्टाइल S13 प्रकारात रवी कार्तिक मुदिगिनाने रौप्य पदक तर पुरुषांच्या १०० मीटर बॅकस्ट्रोक S7 प्रकारात तेजस नंदकुमार याने कांस्य पदक मिळवलं.*
*पुरुषांच्या भालाफेक F41 प्रकारात नवदीपने कांस्य तर F46 प्रकारात सुमितने सुवर्ण पदकाची कामाई केली. महेंद्र गुजरने भालाफेकच्या T42, F42 प्रकारात रौप्य पदक मिळवलं. पुरुषांच्या क्लब थ्रो F 51 प्रकारात प्रणव सूरमा याने सुवर्ण पदकावर नाव कोरलं. तर धर्मवीरने कांस्य पदक मिळवलं. पुरुषांच्या २०० मीटर T37 प्रकाराच्या धावण्याच्या शर्यतीत राकेशभाई भट्टने कांस्य पदक मिळवलं.)*

<><><><><>

'खेत बचाव अभियान-रब्बी २०२६' या देशव्यापी मोहिमेचा प्रारंभ काल केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी हरियाणामधे तारावारी इथून केला. ही मोहीम येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. शेतीला प्रोत्साहन देणं, जमिनीचा आरोग्य सुधारणं, सकटांचं व्यवस्थापन करणं आणि कृषी संसाधनांचा कार्यक्षम वापर करायला प्रोत्साहन देणं, ही या मोहिमेची प्रमुख उद्दिष्टं आहेत. भात कापणीनंतर रिकाम्या राहिलेल्या शेतजमिनींचा अधिक

चांगल्या प्रकारे वापर करावा, जमिनीच्या चाचणीचे निष्कर्ष लक्षात घेऊन त्यानुसार खतांचा संतुलित आणि योग्य वापर करावा, सेंद्रिय शेती पद्धतींचा अवलंब करावा, असं आवाहन चौहान यांनी यावेळी केलं.

<><><><>

केंद्र आणि राज्य सरकारच्या एकत्रित प्रयत्नांमुळे छत्तीसगढ नक्षलवादाच्या समस्येतून मुक्त झाला असून विकासाच्या मार्गावर अग्रेसर होत आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. जगदलपूरमध्ये बस्तर दसरा उत्सवाला त्या आज संबोधित करत होत्या. भारताला विकसित करण्याच्या प्रवासात आदिवासी समाजातले युवक सक्रीय सहभाग घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

***होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू***

<><><><>

राज्य विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीत ५ जागांसाठी आज मतदान पार पडलं. दुपारी २ वाजेपर्यंत औरंगाबाद पदवीधर मतदारसंघात ३६ टक्के, नागपूर पदवीधर मतदारसंघात ३९ टक्के, अमरावती शिक्षक मतदारसंघात ६३ टक्के मतदानाची नोंद झाली होती. मतदानाची वेळ संपेपर्यंत, अर्थात दुपारी ४ वाजेपर्यंत पुणे पदवीधर मतदारसंघात ४० टक्के, तर पुणे शिक्षक मतदारसंघात ५० टक्के मतदान झालं.

<><><><>

शिकाऊ वाहन परवाना मिळवण्यासाठीच्या चाचणीतली उत्तीर्ण होण्याची पातळी ६० टक्क्यांवरुन ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव रस्ते वाहतूक मंत्रालयानं मांडला आहे. याशिवाय भारतीय आणि परदेशी नागरिकांसाठी जारी केलेल्या किंवा नूतनीकरण केलेल्या ड्रायव्हिंग लायसन्ससाठी स्वतंत्र रंगसंगती लागू करण्याचा विचार आहे. मंत्रालयानं केंद्रीय मोटार वाहन नियम सुधारणांचा मसुदा तयार केला आहे. यामध्ये ड्रायव्हिंग लायसन्सवर वाहनचालकाचा रक्तगट, मोबाईल क्रमांक आणि आपत्कालीन संपर्क क्रमांक देणं अनिवार्य करण्याचा प्रस्ताव आहे. यासोबतच, वय आणि पत्त्याचा पुरावा म्हणून कार्यकारी दंडाधिकारी किंवा नोटरीसमोर प्रतिज्ञापत्र देण्याची अट रद्द करण्याचाही प्रस्ताव आहे. गैरवापर टाळण्यासाठी, वय आणि पत्त्याचा पुरावा म्हणून प्रतिज्ञापत्र आणि आयुर्विमा पॉलिसी

स्वीकारण्याचा प्रस्ताव आहे. या मसुदा अधिसूचनेवर मंत्रालयानं संबंधितांकडून ३० दिवसांच्या आत आक्षेप किंवा सूचना मागवल्या आहेत.

<><><><><>

मतदारयाद्यांच्या सखोल पुनरिक्षणा विरोधात निदर्शनं करणाऱ्या अनेकांना आज दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं. दिल्ली कोऑर्डिनेशन कमिटी ऑफ पीपल अगेन्स्ट एसआयआर या संघटनेनं आज केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मुख्यालयावर मोर्चा काढण्याची हाक दिली होती. इतर काही संघटनांनी त्याला पाठिंबा दिला होता. माकपच्या वृंदा करात यांच्यासह अनेक नेते कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले होते.

दरम्यान अशा प्रकारची आंदोलनं दिल्लीतल्या संवेदनशील परिसरात होण्याची शक्यता पोलीस दलानं व्यक्त केल्याच्या पार्श्वभूमीवर  केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या २७३ तुकड्या नवी दिल्लीत येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत तैनात राहतील. दिल्ली पोलिसांच्या विनंतीवरुन केंद्रीय गृहखात्याने हा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

भारतीय अन्न सुरक्षा मानक प्राधिकरण अर्थात FSSAIनं जारी केलेल्या अनेक अन्न सुरक्षा नियमावली आणि आदेशांच्या घटनात्मक वैधतेला राज्य सरकारनं मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. FSSAIनं राज्य सरकारच्या अधिकारांवर अतिक्रमण करून घटनाबाह्य पद्धतीनं समांतर अंमलबजावणी केल्याचा आरोप राज्य सरकारनं केला आहे. अन्न सुरक्षा आणि मानक कायदा २००६ अंतर्गत अन्न नियमनाचं विकेंद्रीकरण केलं आहे, मात्र केंद्र सरकार आणि FSSAIनं ही व्यवस्था मोडकळीला आणल्याचं सरकारचं म्हणणं आहे.

<><><><><>

झारखंडमध्ये सारंडा वनक्षेत्रात अनेक वर्ष सक्रिय राहिलेल्या मंगल आणि मालती या नक्षलवादी जोडप्याने आज कोलकाता पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. मंगलवर झारखंडमध्ये सहा ते सात गुन्हे दाखल आहेत. त्याला पकडण्यासाठी झारखंड पोलिसांनी पाच लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं. मालतीवरही दोन लाख रुपयांचं बक्षीस ठेवण्यात आलं होतं.

दरम्यान, झारखंडमध्ये गुमला जिल्ह्यात पीपल्स लिबरेशन फ्रंट ऑफ इंडिया या नक्षलवादी संघटनेच्या एका विभागीय कमांडरसह तीन सदस्यांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. गुमला जिल्ह्यात बोंगाडा भागात विध्वंसक कारवाया करण्याचा कट रचण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी छापे टाकून या चौघांना अटक केली.

<><><><><>

भारत आणि चीन यांच्यातले वाद सोडवण्यासाठी आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेसंदर्भातले गैरसमज टाळण्यासाठी दोन्ही देश सध्या अस्तित्वात असलेल्या राजनैतिक आणि लष्करी मार्गांचा अवलंब करत आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं आहे. गस्तीचा ठरवलेला मार्ग चीनच्या लष्करानं बदलला, की भारत-चीन सीमेवरची परिस्थिती बिघडत असते, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी आज वार्ताहर परिषदेत सांगितलं. भारत-तिबेट सीमा पोलीस दलाच्या महासंचालकांनी केलेल्या वक्तव्यांबद्दल विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. सीमारेषांचं अधिक चांगलं व्यवस्थापन करण्यासाठी प्रत्यक्ष नियंत्रणरेषेचं आकलन कसं वाढवता येईल, यावर चर्चा करायला दोन्ही देशांनी सहमती दिल्याचंही त्यांनी सांगितलं.

//<><><><><>//